ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# चार्वाकाच्या सुखवादाचा तात्त्विक अन्वयार्थ

***डॉ. बाजीराव माणिकराव पाटील,***

** तत्वज्ञान व तर्कशास्त्र विभाग प्रमुख, विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे*

चार्वाक दर्शन हे ईहवादी दर्शन असून त्यात मनुष्याच्या निर्भेळ सुखाचा विचार करण्यात आला असून सुख हे मानवी जीवनाचे परम प्राप्तव्य असल्याचा विचार ठासून सांगितला आहे. भारतीय दर्शन परंपरेमध्ये आस्तिक व नास्तिक असे दोन परस्पर विरोधी विचार प्रवाह दिसून येतात त्यात प्रत्येकाने मनुष्याला सुख प्राप्त करून देण्यासाठी वेगवेगळे विचार सांगितले आहेत. आज मितीला मनुष्य भविष्यातील सुखाच्या पाठीमागे लागुन वर्तमान सूख उपभोगन्यापासुन वंचित राहून जीवन विवंचने मध्ये जगताना दिसत आहे, याचाच अर्थ मनुष्याला सुख म्हणजे काय? व ती कधी उपभोगली पाहिजेत? याचाच अर्थ उमगलेला दिसत नाही. आशासाठीच चार्वाकांचा सुखवादी विचार मार्गदर्शक ठरणार आहे. चार्वाक भौतिकवादी असल्याने वर्तमान सुखच मनुष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे व ते मिळवण्यावर जोर दिला पाहिजे हे त्याचे म्हणणे अत्यंत उपयुक्त आहे. नेहमी मनुष्य भविष्यातील सुखी जीवन जगण्यासाठी वर्तमान स्थितीत वर्तमान सुखाकडे लक्ष देत नाही,आजच्या सुखाला मुरड घालून भविष्यातील सुखासाठी तो पुंजी जमा करण्याच्या वेडात वर्तमान सुख उपभोगायचे राहून जातो. परंतु भविष्य कोण पाहिलं आहे, मानवी जीवन खूप धक्का-धक्कीचे झाले असून मनुष्यावर नैसर्गिक व मानवी आशा प्रकारची अनेक संकटे दारात उभी आहेत. क्षणार्धात मानवी जीवाच काय होईल? हे सांगता येत नाही. कोरोनाच्या जागतिक माहामारीने लाखोचे प्राण गेले.अशी अनेक संकटे मानवावरती असल्याने मनुष्याने भविष्यातील सुखापेक्षा वर्तमान सुखाला अधिक महत्व देवून ती जास्तीत जास्त उपभोगली पाहिजेत.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

चार्वाकांनी सुख हेच मनुष्याचे सर्वोत्तम ध्येय असल्याचे सांगत वर्तमान सुखावर जास्तीचा भर दिला आहे. त्यांनी "चैतन्य विशिष्ट देह म्हणजेच आत्मा होय" असे सांगितले आहे म्हणजेच जोपर्यंत आपल्यामध्ये चैतन्य आहे, जीव आहे, आपले अवयव कार्यरत आहेत तो पर्यंतच आत्मा आहे. त्यांना पूर्वजन्म-पुनर्जन्म,स्वर्ग-नर्क या संकल्पना मुळीच मान्य नव्हत्या. त्यांनी संपूर्ण शरिरालाच आत्मा मानला, वैदिक दर्शना मध्ये सांगितलेला अमर आत्मा किंवा शरिरापेक्षा वेगळा आत्मा मान्य नव्हता. त्यामुळेच मानवी शरिरात जोपर्यंत चैतन्य आहे तोपर्यंतच काय ते आत्म्याचे अस्तित्व, आत्मा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शरीर, शरिर म्हणजेच आत्मा. हा चार्वाकाचा आत्मविचार खरा मानवी चिंतनाचा विषय आहे. मानवी जीवनाला मर्यादा आहेत काही विशिष्ट कालावधी नंतर मानवी देह नाश पावणार आहे हे ओळखून सुखी जीवनाचे योग्य नियोजन करून जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकदा शरिर नष्ट झाले की त्याचे राखेशिवाय काहीही शिल्लक राहत नाही,पुन्हा त्याचे शरिर होणे नाही. त्या मुळे जास्तीत जास्त सुखाचा उपभोग घेतला पाहिजे.

त्याचप्रमाणे माणसे दुखः वाट्याला आल्यास धीर सोडतात व आत्महत्या सारख्या मार्गाचा अवलंब करून मृत्यूला कवटाळतात परंतु आत्महत्या करून जीवन न संपवण्याचा संदेश चार्वाकांच्या सुखवादातून मिळतो ते म्हणतात सुखाला दुखःची किनार असते म्हणजेच मानवी जीवन सुख व दुखाःचे मिश्रण आहे. त्यातील दुखः अलगतपने बाजूला सारून सुखं उपभोगली पाहिजेत,ज्या प्रमाणे भात खाण्यासाठी साळीवरचे दुखःरूपी तूस बाजूला केल्यासच भातरूपी सुख उपभोगायला मिळेल.मासे खाण्यासाठी त्या तील दुखःरूपी काटे बाजूला करावे लागतील मगच मास्याचा आस्वाद घेता येईल, म्हणजेच सुख हे नेहमी दुखमिश्रीत असत परंतु त्या मिश्रणातील दुखेः बाजूला सारत निर्भेळ सुखाची प्राप्ती करून जीवन जगता आले पाहिजे. भिक्षेकरयाला चुकवून सुग्रास भक्षण करा असा त्यांचा टोकाचा स्व-सुखवाद दिसून येतो त्यांच्या मते मनुष्याने एका घासाच्या आनंदापासून सुद्धा वंचित राहू नये, जर आपण दारावर येणाऱ्या भिक्षेकरयाला आपल्या ताटातील एखादा घास वाढला तर त्या एकाघासाच्या आनंदापासून आपण वंचित राहू शकतो.म्हणून एका घासाच्या देखील आनंदापासून माणूस वंचित राहू नये,प्रत्येक क्षणाक्षणाचा अस्सल आनंद माणसाने घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे वर्तमान सुखाचाच माणसाने जास्तीत जास्त उपभोग घेतला पाहिजे कारण भविष्यात काय होणार आहे? कोणालाही माहित नाही पण वर्तमान मात्र आपण चांगल्या पद्धतीने जगू शकतो जर आपण भविष्यातील सुखाच्या पाठीमागे लागलो तर वर्तमान सुखापासून आपण वंचित राहू व अशी वेळ येते कि "चणे आहेत पण दात नाहीत" म्हणून प्रत्येक सुखाचा निर्भेळ उपभोग त्या त्या वेळीच घेतला पाहिजे.संकटे तर मानवी जीवनामध्ये येतच असतात पण त्या संकटाना बाजूला सारून आत्महत्या न करता मानवी जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण हा मानवी देह पुन्हा पुन्हा मिळणार नाही त्याचा काही पुनर्जन्म होणार नाही. चार्वाक दर्शन हे देहात्मवादी दर्शन आहे. त्याचा जडवाद देहापेक्षा वेगळा आत्मा मान्य करत नाही. याचा स्वभाविक परिणाम असा होतो की ते आत्मा व परमात्मा ते केवळ मान्यच करीत नाहीत भौतिक जीवनासाठी ते पापपुण्य व परलोक मान्य करत नाहीत उलट त्याचा ते निषेध करतात. प्रत्यक्षात अनुभवास न येणाऱ्या अनुमानाची ते चिंता करीत नाहीत. नैतिक दृष्टीकोनातून या दर्शनाला चिंता आहे ती म्हणजे मनुष्याच्या ऐहिक सुखाची. जीवन खूप चांगल्या पद्धतीने कसे जगता येईल याचाच विचार या दर्शनाचा मुख्य सुखवादी विषय आहे. भारतीय दर्शनातील अर्थ व काम हेच पुरुषार्थ चार्वाकांनी मान्य केलेले आहेत. आपल्या इच्छांची पूर्तता आपणास केवळ अर्थानेच होते, इच्छा पूर्ण होवून सुखाची प्राप्ती झाली पाहिजे. सुख-दुखः हे मानवी जीवनात असतातच पण प्रयत्न असा करावा कि सुखच सुख आणि निर्भेळ सुख मिळाले पाहिजे. दुख कमी प्रमाणात अनुभवास आले पाहिजे. याचा अर्थ असा कि ईहवादी चार्वाक,सुखवाद मान्य करतात त्याचे नैतिक तत्त्वज्ञान सुखवादी तत्त्वज्ञान आहे. सुख हेच जीवनाचे ध्येय आहे,त्यातही त्यांनी स्वतःच्या सुखाला प्राधान्य दिले आहे.

ते स्वतःच्या सुखाला एवढे प्राधान्य देतात की....

"ऋनं क्रुत्वा घृतं पिबेतं,

भस्मिभुतस्यं देहस्यं

पुनरागमन कुतः"

या श्लोकाचा अर्थ आसा आहे कि ,कर्ज काढा व तुप प्या हा नश्वर् देह नाश पावला कि पुन्हा प्राप्त होणार नाही,पुनर्जन्म आहे कि नाही हे कोणास माहित आहे? त्या करिता स्वतःच्या सुखाची जास्तीत जास्त प्राप्ती करून घेतली पाहिजे.चांगले जीवन तेच असते कि त्यात जास्तीत जास्त सुख असल पाहिजे आणि कमीत कमी दुखः असल पाहिजे.चार्वाक जास्तीत जास्त इंद्रिय सुखाला महत्व देतात. यात बौद्धिक सुखापेक्षा शारिरीक सुख अधिक महत्वाचे आहे.

भारतीय तत्वज्ञानात धर्म,अर्थ,काम व मोक्ष या चारही पुरुषार्थाला महत्व देण्यात आले आहे परंतु चार्वाक केवळ अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ मानतात.त्याच्या मते धर्म-अधर्म ह्या धूर्त लोकाच्या कल्पना असून आणि मोक्ष तर नाहीच मोक्षाचा अर्थ जर सर्व दुःखाची शांती असेल तर ते म्रतुयाच्या नंतर शक्य होत असेल तर मोक्ष पुरुषार्थाची गरज नाही.एकमात्र पुरुशार्त सुख आहे व ते सुख आपण अर्थ पुरुषार्थाच्या साह्याने मिळवू शकत असल्याने अर्थ पुरुशार्थचत्यांनी मानला. कामाच्या साह्याने पण आपणास परमोच्च सुखाची प्राप्ती होत असल्याने अर्थ पुरुषार्था बरोबरच काम पुरुषार्थ चार्वाकानी मानला आहे.सुखाच्या माघे पडलेल्या पण ढोंग करणाऱ्या वैदिक लोकांचे चार्वाकानी कडक शब्दात खंडन केले आहे.जप करणे,अंगास भस्म लावणे, वेद पठण करणे आणि लोकांना फसवून आपले पोट भरणे हा व्यवसाय करणाऱ्या लोकांना सुधा सुखच पाहिजे असते.

वेदांच्या परंपरेतल्या, यज्ञयाग, पूजाअर्चा, अग्निहोत्र, श्राद्ध, स्वर्ग-नरक, कर्म- कर्मफळ, पूर्वजन्म- पुनर्जन्म, मोक्ष या सर्व कल्पना व कर्मकांड ही लोकांना लुबाडण्यासाठी, बनेल हितसंबंधीयांनी निर्माण केलेले भ्रमजाल आहे. पातिव्रत्य हे मूल्य नसून स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे, जुलमी पुरुषांचे एक हत्यार आहे. वर्णाश्रम व जातिभेद हे अशास्त्रीय आहेत. या विचारांची विधायक बाजू अशी- स्वतःची बुद्धी हेच खरे प्रमाण आहे. हे ऐहिक जीवनच खरे आहे. शेती, व्यापार, गोपालन, प्रशासन आणि उपयुक्त शास्त्रांचे अध्यापन अशा साधनांनी काम करून द्रव्य मिळवावे आणि सर्व सुखोपभोग मिळवून नीतीने जगावे. स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. सुखी होण्यासाठी माणसाने उद्योग करावेत, अर्थप्राप्ती करून घ्यावी. पण असा हा चार्वाकवादातल्या 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्, भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः'.. या वाक्यामुळे काहीसे हेटाळले गेले. पण खरे पाहिले तर, हे तत्त्वज्ञान अयोग्य गोष्टी सुचवत नाही. उलट, ते सुखासाठी चोरी किंवा मद्यप्राशन योग्य नाही असे सांगून, हिंसेचा धिक्कार आणि शाकाहाराचे समर्थन करते. वेदान्त हा सत्य नसून वेद रचणारे निशाचर, धूर्त आहेत. अग्निहोत्र आणि वेदांचे पठण तसेच त्यांतील होमहवन हे उपयुक्त नाहीत. पौरोहित्यावर गुजराण करणाऱ्यांची चार्वाकाने निंदा केली आहे. सुख मिळवण्यासाठी प्रामाणिक श्रम करावेत, काव्य, नृत्य, संगीत या कलाही हव्यात, राजकीय स्थैर्य हवे आणि स्वार्थीपणा नको असा हा विचार आहे.

कृषिगोरक्षवाणिज्यदण्डनीत्यादिभि: बुधैः।
एतैरैव सदोपायैर्भोगाननुभवेद्भुवि ॥

शहाण्यांनी या जगात शेती, गोपालन, व्यापार, प्रशासन सेवा इत्यादी कामे करून मिळालेल्या द्रव्याच्या साह्याने सुखोपभोग घ्यावेत, हाच लोकायतांचा आदर्श आहे.

**संदर्भ :**


- सिन्हा जदुनाथ,भारतीय दर्शन ,अनुवादक भट्ट गोवर्धन ,मोतीलाल बनारसी पब्लिशर्स ,दिल्ली. तृतीय आवृत्ती पुनर्मुद्रण 2010
- डोणगावकर वेदप्रकाश,भारतीय तत्वज्ञान मैत्री प्रकाशन,लातूर 21 फेब्रुवारी 2020


**Cite This Article:**

***डॉ. बाजीराव माणिकराव पाटील,(2022***) चार्वाकाच्या सुखवादाचा तात्त्विक अन्वयार्थ, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue -II), 19-22.*